BYTES OF INDIA
Positive Media & Press Release Network

एक तरी
ऋचा
अंगीकारावी

**एक तरी ऋचा अंगीकारावी** हे डीजींचं हे पुस्तक वाचायला सुरवात केलं आणि पहिल्याच प्रकरणाने माझी झोप उडवली. गेली अनेक वर्षं अथर्वशीर्ष म्हणतोय. पण हा असा विचार माझ्या मनामध्ये कधीच का येऊ नये ही चुटपुट सुद्धा मनाला लागली. **धक्का बसणं आणि खडबडून जागं होणं हे मी अनुभवलं**. गणपती अथर्वशीर्ष हे गणपतीसाठी नसून स्वतःसाठी आहे असं ठामपणे सांगणारं आणि अत्यंत सोप्या पद्धतीने ते उलगडून दाखवणारं असं हे पुस्तक आहे. **डीजींचा (लेखकाचा) व्यवस्थापन आणि नेतृत्व या विषयांमधील दांडगा अनुभव या पुस्तकामध्ये जाणवत असतानाच अत्यंत लाघवी आणि सोप्या पद्धतीने, एक मित्र म्हणून ते हे सगळं आपल्यासमोर मांडतात.** अथर्वशीर्षावर लिहिलेल्या पुस्तकामध्ये आकृत्या किंवा तक्ते असतील अशी शंकासुद्धा संवाद **शास्त्रावरची एक आकृती समोर येते. अव वक्तारम्, अव श्रोतारम्, त्वम् चत्वारि वाक्पदानि या ऋचांबद्दल डीजी जे मांडतात ते समजावून घेत असताना अंगावर शहारा येतो**. या तीन ऋचा जरी अंगात मुरवल्या, डीजींचा शब्द 'अंगीकारल्या', तरी सुद्धा स्वतःच स्वतःने आयुष्यामध्ये तयार करून ठेवलेले प्रश्न चुटकीसारखे सुटतील हो याची पक्की खात्री पटते. मात्र **नुसतं पटून उपयोग नाही हे "शहाणपणाच्या सप्तपदीमध्ये" घोटवलं जातं**. खरं आणि खोटं याची संकल्पनाच ऋतम् वच्मि सत्यम् वच्मि या प्रकरण वाचल्यानंतर बदलते. हाती घेतलेल्या कामाशी प्रामाणिक राहणे इतकी सोपी युक्ती **बिरबल, द्रोणाचार्य, चोरांचं टोळकं या गोष्टींतून डीजी सांगतात. कमाल वाटते या सगळ्याची**. पंचतत्व इतक्या सोप्या पद्धतीने सांगितलेली मी अजून कुठे वाचली नाहीत. या संपूर्ण पुस्तकाचा उद्देशच मुळी स्वतःची जडण घडण करण्यासाठी आहे. **विवेके क्रिया आपुली पालटावी या समर्थ वचनाप्रमाणे, क्रिया पालटवण्यासाठीचा नुसता विचारच नाही तर साध्या सोप्या युक्त्या तितक्याच सोप्या भाषेत मांडल्या**

**आहेत**. २०वं प्रकरण तर मुकुटमणी आहे. आयसिंग ऑन केक असं म्हणतात ना तसं. मूलाधार स्थितोसि नित्यं असं प्रत्येक वेळी मी अथर्वशीर्ष म्हणताना म्हणतो. पण **स्वतःच्या मूलाधाराची, अस्तित्वाच्या आधाराची साधी दखल सुद्धा घेत नाही**, हे जाणवलं. 'मग, आता पुढे काय?' असा प्रश्न मनात येतो न येतो तोच, **पुस्तकामध्ये लगेच त्याचं साधं सोप्प उत्तर सापडतं**. २१वं प्रकरण तर धमाल आहे. नाटकाचा प्रयोग संपतो त्यावेळी कसे सगळे कलाकार एकत्र रंगमंचावर येतात. हे प्रकरण वाचताना तसं काहीसं वाटत. आणि **हे सगळे कलाकार - ब्रह्मा, विष्णू, महेश, इंद्र, अग्नी हे मीच. माझीच एक नाटक कंपनी!** शेवटी गुलजार यांची **'बूढी अलमारी' ढवळून टाकते.** मोठा दिलासा हाच असतो की, नशीबाने हे जुनं कपाट आहे अजून, त्यातल्या माझ्याच हरवलेल्या गोष्टी शोधायच्या आहेत. **हे न संपणारं पुस्तक आहे**. कदाचित शेवटच्या दिवशी सुद्धा एखादं प्रकरण मी वाचून अंगीकारण्याचा प्रयत्न करत असेन. किंबहुना तसंच व्हावं ही गजानन चरणी प्रार्थना. डीजींना मनापासून धन्यवाद आणि तुम्हा सर्वांना कळकळीची विनंती की हे पुस्तक, ई-पुस्तक, आणि व्हिडिओ मालिका अवश्य घ्या.

**- आलाप कुलकर्णी**

............

**पुस्तक :** एक तरी ऋचा अंगीकारावी - अथर्वशीर्ष : एक स्व-संवाद

**लेखक :** धनंजय गोखले

**प्रकाशक :** धनंजय गोखले

**पृष्ठे :** २००